April 2018

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
**Mr.Arun B. Godam**

www.rjournals.co.in

# CURRENT GLOBAL REVIEWER

**Half Yearly** Nov. 2017-Apr. 2018 | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648**
Issue X Vol. VI ,April. 2018 | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143**


## Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | The Relation Between The Level Of Job Satisfaction And TypesOf Personality In Higher Secondary School Teachers | Smt. Geeta H. Inginshetty | 1 |
| 2 | Anxiety And Mental Health Of Chronic Patients | Dr. .AnilkumarTengli | 5 |
| 3 | Globalization And Social, Economical Development In India | Mr. Pawar S.S | 10 |
| 4 | Levels of agricultural Technology in Satara District : A Geographical Study | Dr. B.R.Shinde | 13 |
| 5 | "Comparative Study Of Anxiety Level Of Tribal And Non-Tribal Athletes" | Dr. Sunilkumar | 16 |
| 6 | "Effect of minor games on physical fitness of school going children" | Prof. Sughand Band | 19 |
| 7 | Indian Agriculture Sector Before and After Globalisation - An Analysis | Dr. MarotiTegampure, Dr. Amrita Sahu | 24 |
| 8 | हिन्दी उपन्यासो में अभिव्यक्त नारी - विमर्श | डॉ. संतोष पवार | 31 |
| 9 | मोहन राकेश के नाटकों में तात्विक विवेचन | डॉ. सचिन रमेशराव चोल | 35 |
| 10 | साहित्य आणि समाज सहसंबंध | डॉ. प्रा. गणेश लहाने | 41 |
| 11 | शिवाजी महाराजांचे मुस्लिम सहकारी | डॉ. आर. एस. पारवे | 46 |
| 12 | अश्क के नाटकों की पृष्ठभूमि | डॉ. प्रदीप सूर्यवंशी | 49 |
| 13 | उस्मानाबाद जिल्हयातील कृषी उत्पादकतेचा भौगोलिक अभ्यास | Dr. F.R. Pawar | 52 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X, Vol.VI ,April. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# शिवाजी महाराजांचे मुस्लिम सहकारी

**डॉ. आर. एस. पारवे**
संशोधक मार्गदर्शक व विभाग प्रमुख , इतिहास विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर

-------- (11) --------

छ. शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य स्थापन केले. सर्व जाती धर्मातील लोकांसाठी हे राज्य स्थापन केले. सर्व जाती धर्मातील लोकांसाठी राज्य स्थापन केले त्यामुळेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आठवण झपाटल्या बरोबर महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला त्यांचा अभिमान वाटतो. छ. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले राज्यही येथील प्रत्येक जाती-धर्माच्या माणसाला आपले राज्य वाटत होते. हिंदवी स्वराज्याच्या जडण घडणीसाठी बाराबलुतेदार, अठरा अलुतेदार, गार कुसा बाहेर गाव उसातील प्रत्येकांनी सहभाग घेतलेला आहे. छ. शिवाजी महाराज आतापर्यंत अनेक संशोधक लेखकांनी प्रचंड लिखाण केलेले आहे. छ. शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेत व जडण-घडणीत सर्वच जाती धर्मातील विविध घटकांनी सहभाग घेतला त्यामध्ये मुस्लिमांचा सहभाग देखील अतिशय महत्त्वपूर्ण आहे. ही अनुषंगाने आणखीनही संशोधन व लिखाण झाले पाहिजे. छ. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यातील सर्व जाती धर्मातील लोकांना व मुस्लीम समाजाला अत्यंत सन्मानाने वागवले हे दिसून येते. स्वराज्याच्या जडणघडणीमध्ये छ. शिवाजी महाराजांनी मुसलमानांना अत्यंत सन्मानाने सहभागी करून घेतले होते.

छ. शिवाजी महाराजांचा संघर्ष अनेक मुस्लिम सरदारांची झाला असला तरी तो संघर्ष धार्मिक नसून राजकीय होता. अनेक मुस्लिम राज्यांच्या सैन्यात व प्रशासनात मुस्लिम मन बरोबर हिंदूही होते. छ. शिवाजीच्या विरोधामध्ये लढत होते. तर छ. शिवाजीच्या व प्रशासनातील मुस्लिम हे शिवाजीसाठी व स्वराज्यासाठी इतर राज्यांचा विरोधात लढत होते.[१] छ. शिवाजी महाराजांच्या राज्यात, प्रशासनात व सैन्यात अनेक मुसलमान सरदार, वतनदार, सैनिक व इतर चाकर होते आणि ते अगदी मोठ्या हुद्द्यावर व जबाबदारीच्या जागांवर होते.[२] शहाजीराजे बंगरूळ येथे असताना १६४१-४२ मध्ये जिजाबाई व बाल-शिवाजी राजे हे शहाजीच्या भेटीसाठी बंगळूर येथे गेले होते. तेथून परत पुण्याच्या जहागिरीत असताना शहाजी राजांनी शिवाजी सोबत अनेक कर्तबगार मंडळी दिली होती.[३] त्यावेळी शहाजींनी शिवाजी सोबत साक्षी मुस्लिम पठाणांची फौज दिली होती. पुढे हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यात व वाढविण्याच्या प्रक्रियेत अनेक मुस्लिम सरदार शिवाजीच्या सोबत होते. अनेक विश्वासू मुस्लिम सरदार वनकर शिवाजीच्या सोबत होते. शिवाजीच्या स्वराज्या मध्ये सर्व जातीधर्माच्या लोकांना आपापल्या धर्म व परंपरांचे पालन करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य होते. छ. शिवाजी महाराजांकडे असलेल्या एकूण संख्या ३५ ते ४० टक्के मुसलमान होते.[४]

छ. शिवाजी महाराजांनी मुस्लिम संत आणि मुस्लिम देवस्थानांना जमिनी इनाम देऊन त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था शासकीय खर्चातून केली. छ. शिवाजी यांनी मोरोपंत पिंगळे यांना आज्ञा करून रायगडावर मुस्लिम प्रजेसाठी मशीद बांधली. छ. शिवाजी राजांच्या सोबत त्यांचे अनेक मुस्लिम सहकारी एकनिष्ठ राहिले.

**सिद्धी इब्राहिम :**

हे शिवाजीचे अंगरक्षक होते. अफजलखान भेटीच्या वेळी छ. शिवाजींच्या रक्षणाचे काम त्यांनीच केले होते. एप्रिल सोळाशे ७५ मध्ये सिद्दी इब्राहिम यांनी सुरुंग लावून कुंड्यांचा किल्ला जिंकला तेव्हा छ. शिवाजी ने सिद्दी इब्राहिम चा सत्कार केला होता. नंतर शिवाजीने सिद्धी यांची कोंडाणा किल्ल्याचे किल्लेदार म्हणून नियुक्ती केली.[५]

**इब्राहीम खान :**

छ. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचे सुराज्य तोफखाना निर्माण केला. त्या काळात लष्करात तोफखाना हे सर्वात प्रगत शस्त्र होते. किल्ल्याच्या लढाईत तो खान याला विशेष महत्त्व होते. छ. शिवाजीच्या लढाई तोफखान्याला

**मौनीबाबा आणि बाया याकूत :**

पाटगाव चे मौनीबाबा आणि केळशीचे बाबा याकूत हे मुस्लिम संत शिवाजीराजांचे हितचिंतक होते. त्यांच्या भेटीसाठी शिवाजीराजे पारगावला आणि केळशीला अनेक वेळा गेले होते. या मुस्लीम संतांनी शिवाजीराजांना प्रचंड मदत केली होती.[१०]

**सारांश :**

हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याच्या वाट होण्याच्या प्रक्रियेत छ. शिवाजी महाराजांना त्यांच्या अनेक मुस्लीम सहका?यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. शिवाजी हे सर्व मुस्लिम सहकारी कित्येक मुस्लिम सैनिकांसह शिवाजी राजांच्या सोबत होते. छ. शिवाजीराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य हे सर्व जाती धर्मातील जनतेसाठी व रयतेसाठी होते म्हणून शिवाजीराजांचा राज्यात आणि हिंदू बरोबरच मुस्लिमही सहभागी होते. यासारख्या असंख्य मुस्लिमांनी शिवरायांना मदत केली. शिवाजीराजांनी मुस्लिमांच्या धार्मिक बाबतीत ही ढवळाढवळ केली नाही. याउलट अफजलखान ठार मारल्यानंतर अफजलखानाचे मुस्लिम पद्धतीने दफन केले व त्याचा खर्च शिवाजीराजांनी दिला. मदारी मेहतर च्या मृत्यूनंतर मदारी मेहतर ची कबर शिवाजीराजांनी रायगडावर बांधली. मुस्लिम सैनिकांना नमाजासाठी शिवाजी राजांनी रायगडावर मशीद बांधली. एकंदरीत शिवाजीराजांनी सर्व जाती धर्मातील जनतेच्या कल्याणासाठी राज्य केले. त्यांच्या स्वराज्य निर्माण करण्याच्या प्रक्रियेत हिंदू धर्मातील एका जातीचा लोकांबरोबर अनेक मुस्लिमांचे योगदानही. अनेक मुस्लिम अत्यंत विश्वासपूर्ण व प्रामाणिकपणे छ. शिवाजी राजांचे सोबत होते.

**संदर्भ सूची**

०१. श्रीमंत कोकाटे - 'शिवाजी राजांचे खरे कोण', मराठा सेवा संघ, पुणे, पृष्ठ ६८
०२. गोविंद पानसरे - 'शिवाजी कोण होता - १९९६', पृष्ठ २२
०३. प्रा. मदन मार्डीकर - 'मराठ्यांचा इतिहास', विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ ४४
०४. ओहोळ डी. आर. - 'छत्रपती शिवाजी महाराज', मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पृष्ठ १८
०५. श्रीमंत कोकाटे - 'छत्रपती शिवाजी महाराज', जिजाई प्रकाशन, पृष्ठ ६०
०६. गोविंद पानसरे - 'शिवाजी कोण होता', पृष्ठ २२
०७. श्रीमंत कोकाटे - 'छत्रपती शिवाजी महाराज', जिजाई प्रकाशन, पृष्ठ ६१
०८. कित्ता, पृष्ठ ६०
०९. कित्ता, पृष्ठ ६१
१०. कित्ता, पृष्ठ ६२

Current Global Reviewer


ISSN 2319-8648

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

UGC Approved Journal
Sr. No. 64310





Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999



SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in